ग्रामपंचायत अधिकारी या पदावर जिल्हा परिषद सेवेमध्ये
पुन:स्थापित करणेबाबत. (श्री.खेडकर भगवान भिवसेन,
ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत-अकोले,ता.पाथर्डी)

जिल्हा परिषद अहिल्यानगर
ग्रामपंचायत विभाग
आदेश क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/३७६/२०२६
दिनांक- स्वाक्षरी खाली नमुद केलेप्रमाणे

संदर्भ - १.या कार्यालयाकडील सेवानिलंबन आदेश क्र.ग्रापं-३/२२८/२०२६, दि.१०/०६/२०२६.
२. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम (६)(३)
३. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम (६)(५)
४. शासन निर्णय क्र.निप्रआ११२२/प्र.क्र.०९/विचौ२/२०२५,दिनांक २२ एप्रिल २०२५.

संदर्भ क्रमांक १ चे आदेशान्वये श्री.खेडकर भगवान भिवसेन, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत-अकोले, ता.पाथर्डी येथे कार्यरत असताना त्यांनी त्यांचे ग्रामपंचायत कार्यालयीन कामी गैरवर्तन केल्याने जिल्हा परिषद सेवेतुन सेवानिलंबित करणेत आलेले आहे. श्री.खेडकर भगवान भिवसेन, सेवानिलंबित ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत अकोले,ता.पाथर्डी यांचे गैरवर्तनाबाबत शिस्तभंग विषयक कार्यवाही सुरु केलेली आहे.

संदर्भ क्रमांक ४ चे शासन निर्णयानुसार श्री.खेडकर भगवान भिवसेन सेवा निलंबीत ग्रामपंचायत अधिकारी यांचा निलंबन कालावधी हा तीन महिन्यांपेक्षा कमी झालेला असल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे पोट नियम ३(५) नुसार, प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी, मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद अहिल्यानगर तथा सक्षम प्राधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर या आदेशान्वये श्री.खेडकर भगवान भिवसेन, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत-अकोले,ता.पाथर्डी यांना ग्रामपंचायत अधिकारी या पदावर जिल्हा परिषद सेवेत पंचायत समिती ----शेवगाव---------- येथे पुन:स्थापित करीत आहे.

श्री.खेडकर भगवान भिवसेन, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत-अकोले,ता.पाथर्डी यांचा या सेवा निलंबन कालावधीचा निर्णय, पुढील सुरु असलेली शिस्तभंगविषयक कार्यवाही पुर्ण झालेनंतर स्वतंत्ररित्या घेण्यात येईल. जिल्हा परिषद सेवेत पुन:स्थापित आदेशाची नोंद, श्री.खेडकर भगवान भिवसेन, सेवानिलंबीत ग्रामपंचायत अधिकारी यांचे मुळ सेवा पुस्तकात संबंधित खातेप्रमुख यांनी घ्यावी.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक 202611120E029U.....असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 12-11-2026 16:34:37
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

१. श्री.खेडकर भगवान भिवसेन, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत-अकोले,ता.पाथर्डी
व्दारा :- गटविकास अधिकारी, पंचायत समिती अहिल्यानगर
२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती अहिल्यानगर.
२/-सोबतचा आदेश संबंधीतास बजावून तो मिळालेबाबतची पोहोच कार्यालयास सादर करावी.
३. गटविकास अधिकारी, पंचायत समिती पाथर्डी यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी
४. गटविकास अधिकारी, पंचायत समिती --शेवगाव-------
२/- श्री.खेडकर भगवान भिवसेन, सेवानिलंबीत ग्रामपंचायत अधिकारी हे हजर झालेनंतर अहवाल इकडेस सादर करावा.